www.lokmat.com
लोकमत
epap
छत्रपती संभाजीनगर, शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५

# पाच हजार गुन्ह्यांचा छडा

## नांदेड पोलिस विभागाने केली चांगली कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** जिल्ह्यातील ३६ पोलिस ठाण्यामध्ये मागील वर्षभरात ६ हजार ५४९ एवढ्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यापैकी ५ हजार १६९ गुन्ह्यांची उकल करण्यात जिल्हा पोलिस दलाला यश मिळाले आहे. कमी वेळेत पोलिसांनी गुन्ह्यांचा छडा लावला आहे.

मागील वर्षभरात खून, दरोडा, घरफोडी, मारहाण, लुटमार, चोरी, चैन स्नॅचिंग, अपहरण, फसवणूक, मोबाईल चोरी, खंडणी यासह विविध प्रकारचे गुन्हे पोलिस ठाण्यात दाखल झाले होते. काही प्रकरणामध्ये पोलिसांना गुन्ह्याची उकल करण्यास उशिर लागला असला तरी ८० टक्के गुन्ह्यांची पोलिसांनी अगदी कमी वेळात उकल करुन आरोपींना शिक्षेपर्यंत नेऊन पोहचविले. तर चोरी, चैन स्नॅचिंग, फसवणूक या सारख्या प्रकरणात फिर्यादीला त्यांचा मुद्देमाल परत दिल्याने त्यांच्याकडूनही समाधान व्यक्त केले.

**१२ महिने**

जिल्ह्यामध्ये विविध पोलिस ठाण्यात एकूण ६ हजार ५४९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. मागील वर्षीपेक्षाही गुन्ह्यांचे प्रमाण काहींसे वाढले असले तरीही त्याच तुलनेत गुन्हे उकल होण्याचे प्रमाणही वाढले.

### सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या

मागील वर्षभरात घडलेल्या गुन्ह्यामध्ये फरार असलेल्या अनेक सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळत त्यांना कोठडीत टाकले. तसेच इतर गुन्ह्यातही गुन्हेगारांचा तात्काळ शोध लावून त्यांच्यात एक वचक निर्माण केली आहे. त्यामुळे गुन्हेगारीस आळा बसण्यास मदत होत आहे.

### वर्षभरात गुन्हे उकल होण्याचे प्रमाण वाढले

**२०२४**

| | |
|---|---|
| एकूण गुन्हे दाखल | ६५४९ |
| गुन्ह्यांची उकल | ५१६९ |
| उकल होण्याचे प्रमाण | ८०.१५% |

### तपासात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचीही मदत

पोलिसांनी गुन्ह्यांची उकल करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यासाठी सायबर विभागाची मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. याशिवाय स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानेही गोपनीय पद्धतीने आरोपी शोधले.

### सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपीस घेतले ताब्यात

मागील वर्षी बॅग लिफ्टींगचा गुन्हा शहरात घडला होता. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीच्या चालण्याच्या पद्धतीवरुनच शोध लावत त्यास उचलत पोलिस कोठडीत पाठविण्यात आले. तसेच अन्य एका खून प्रकरणामध्ये पोलिसांनी बुटाच्या रंगावरुन देखील आरोपीची ओळख पटवून त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या.




### ६ हजारपैकी ५ हजार गुन्ह्यांची उकल

जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान घडलेल्या ६ हजार ५४९ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी ५ हजार १६९ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी गुन्हे शोधकामी विविध पथके तयार केली होती. तसेच वेगवेगळे ऑपरेशन देखील वर्षभरात पोलिसांनी जिल्हाभरात राबविले होते.

### गुन्हेगारीला आळा बसणार

**जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी करण्यावर पोलिसांचा भर असेल. सराईत गुन्हेगारांवर पोलिस विभागाचे विशेष लक्ष असणार असून अतिरेक करणाऱ्यांना तडीपार करण्यात येईल.**

**अबिनाशकुमार**, पोलिस अधीक्षक

### कार्यपद्धती बदलल्याने पोलिसांच्या हाताला यश



घडलेल्या गुन्ह्याचा शोध घेताना पोलिसांनी शोध घेण्याच्या पद्धती बदलल्या. त्यामुळे गुन्ह्यांची उकल करणे शक्य झाले. याशिवाय जिल्हा पोलिस दलाची सीसीटीएनएस प्रणालीत देखील कामगिरी चांगली आहे.